स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजीकशास्त्रे या विद्याशाखांतर्गत इतीहास विषयातील पीएच.डी. पदवीच्या नियोजीत संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

"मराठवाड्यातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा एक शिल्पशास्त्रीय अभ्यास" (११ वे ते १४ वे शतक)

संशोधक

गाडगे विश्वमित्र बाबाराव

एम.ए.बि.एड, स्टडी ऑफ म्युझियम, डि. योगा

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ.बावळे एन.पी.

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग

प्रमुख, शारदा महाविद्यालयकला व विज्ञाण परभणी.

इतिहास अभ्यासमंडळ सदस्य स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

संशोधन केंद्र

इतिहास विभाग ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे, कला,

वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

डिसेंबर-२०२२

प्रस्तावना

मराठवाडा प्रदेशाला प्राचीन काळापासुन धार्मिक सांस्कृतीक, राजकिय, ऐतिहासीक वारसा प्राप्त झालेला आहे. मराठवाडा प्रदेश हा सोळा महाजन' काळात देखिल अस्तित्वात होता. 'अश्मक' 'मुलक' हि जनपदे गोदावरीच्या खो-यामध्ये अस्तित्वात होती. गोदावरीचा समृध्द व संपन्न प्रदेश असल्याने या ठिकाणी मानवी संस्कृती वास्तव्यास होत्या.

सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, शिलाहार, चालुक्य देवगिरीचे यादव इत्यादी सत्ता मराठवाडयात परिसरात होत्या. या राजपरिवारातील राजांनी राज्य कारभारासोबत विविध कलागुणांना राजाश्रय दिला यांच्या कालखंडामध्ये मंदिर स्थापत्य व शिल्प या कलांना प्रोत्साहन देण्यात आले होते.

इ.स. पाचव्या शतकामध्ये 'तेर' या गावात 'विष्णु' 'त्रिविक्रम' मंदिर बांधले गेले (संशोधकाच्या मते) हे मंदिर महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन मंदिर आहे. येथून मंदिरस्थापत्या सोबतच शिल्पशास्त्राचा विकास मराठवाडयात पुढे १४ व्या शतकापर्यंत मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. याच कालखंडामध्ये गोदावरीच्या खो-यामध्ये शिल्पांकीत बांधीव मंदिर निर्मीती मोठ्या प्रमाणात होवून पुढे हि कला स्थापत्यकलेचे व शिल्पकलेचे केंद्र म्हणुन उदयास आले असावे. या मध्ये 'कंधार', 'तेर', 'होट्टल', 'धर्मापुरी', 'पानगांव', 'अंबेजोगाई', 'औंढा नागनाथ' 'बिड', 'धारासुर' 'चारठाणा' ईत्यादी स्थळांचा व सर्व जिल्हा स्थळांचा समावेश होतो. या मंदिरावरील शिल्पांचा शिल्पशास्त्राच्या अंगाने विचार केला असता अप्रतिम कलाविष्कार या परिसरात झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात शिल्पशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात 'पश्चिमात्य' विद्वानांनी केली आहे. त्यामध्ये जेम, बर्जेस, जेम्स फर्ग्यूसन, पर्सी ब्राऊन, हेन्री काझीन्स इत्यादी तसेच कांही भारतीय विद्वानांत आनंद कुमार, ए.व्ही. नाईक, एस.बी.देव, गो. ब. देगलूरकर, प्रभाकर देव, किरण देशमुख, ए. डी. शिंदे यांनी मोलाचे योगदान दिले.

इ.स.११ वे ते १४ वे शतकात मराठवाडा परिसरात 'शैव' 'वैष्णव' शिल्पांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. यातील वैष्णव शिल्पांचा शिल्पशास्त्रीय

पध्दतीने अभ्यास होणे आवश्यक आहे. शिल्पांकीत मंदिरावरील शिल्पांचा सखोल अभ्यास करुण उपलब्ध होणा-या माहीतीचा उपयोग सामान्य जनतेला होण्यास मदत ठरेल तसेच या वास्तु विषयी सामान्य जनतेला जिव्हाळा निर्माण होईल.

विषय निवडिचा उद्देश

प्राचीन मराठवाडयाचा वैभवशाली इतिहास सांगणा-या अनेक वास्तुकला मराठवाड्यात आहेत. त्याविषयी असलेल्या अज्ञानामुळे व शाषनाच्या दुर्लक्षामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. इतिहासाचा हा अमुल्य ठेवा असुन त्याचा ही अभ्यास होणे आवश्यक ठरते. आजच्या पुढारलेल्या समाजात या शिल्पाचा च देव देवतांच्या प्रतिमा कडे माहीती अभाची दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे. हे अज्ञान माहिती मधुन दूर होवु शकते. त्यासाठी शिल्पांचा सखोल अभ्यास महत्वांचा ठारतो. या परिसरा मध्ये मंदिरावर वैष्णव प्रतिमांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसुन येते. या शिल्पाचे धार्मिक, सांस्कृतीक महत्य काय असावे, तसेच या शिल्पांचा शिल्प शास्त्रीय दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक आहे. शिल्पांकीत मंदिर व त्यावरील वैष्णव प्रतिमा अभ्यासातुन तात्कालीन समाजाचे जिवण प्रतिबींबीत झाल्याचे दिसून येते. त्याचा देखिल अभ्यास होणे आवश्यक आहे. मराठवाडयातील मंदिरावरील वैष्णव शिल्पांची पाहणी केली असता, 'वैष्णव' संप्रदायातील विविध अवतार शिल्प 'वैष्णव शक्ती' शिल्प इत्यादीचे शिल्यांकन झाल्याचे दिसुन येते. या शिल्पांचा अतापर्यंत म्हणावा तसा अभ्यास झाला नसुन यावा सखोल व शिल्पशास्त्रीय दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक वाटते. याच उद्देशाने मी माझ्या शोध प्रबंधासाठी 'मराठवाडयातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा एक शिल्पशास्त्रीय अभ्यास' (११ वे ते १४ वे शतक) हा विषय निवडला असुन या अंतर्गत मराठवाडयातील वैष्णव प्रतिमा शिल्पशास्त्राच्या अंगाने व संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी 'मराठवाडयातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा या विषयावर अभ्यास केला आहे. मराठवाडा प्रदेशातील आजच्या आठही जिल्हयात

शिल्पांकीत बांधीव मंदिरावर वैष्णव शिल्पासोबतच शैव शिल्पांचे आंकण मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे 'वैष्णव' प्रतिमाचा सखोल अभ्यास होण्यासाठी इतर शिल्पांचा अभ्यास होणे शक्य नाही, तसेच प्रस्तुत प्रबंधासाठी ११ वे ते १४ वे शतकातील मंदिरावरील वैष्णव शिल्पांचा अभ्यास केला जाणार असून संशोधनात मर्यादा येते. त्याच बरोबर पुरातत्वीय स्थळांचा ठिकाणी असणारे नियम, वेळ, श्रम, पैसा, अंतर, या वैयक्तीक मर्यादा लक्षात घेवून शक्य तितक्या निवडक शिल्पांची निवड केली गेली असुन वैष्णव संप्रदायाच्या संबंधीत शिल्प यांचा विस्तृत स्वरुपात अभ्यासामुळे संशोधनात मर्यादा येतात.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) मराठवाडयातीरल वैष्णव संप्रदायाच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२) मंदिरावरील वैष्णव शिल्पांचा अभ्यास करणे.

३) मराठवाडयातील मंदिरावरील शिल्पांच्या अभ्यासातून वैष्णव पंथाच्या प्रसाराचा अभ्यास करणे.

४) मराठवाडयातील वैष्णव शिल्पाच्या माध्यमातुन तात्कालीन सामाजिक, सांस्कृतील जिवन अभ्यासने.

५) शिल्पाच्या माध्यमातून सांप्रदायीक एकत्मतेचा अभ्यास करणे.

गृहितके

१) मराठवाडयामध्ये ११ वे ते १४ व्या शतकात मंदिर निर्मिती मोठया प्रमाणात झाली.

२) लेणी निर्मिती नंतरच्या काळात मराठवाडयात मंदिर व शिल्प निर्मितीस चालना मिळाली.

३) मराठवाडयातील मंदिरावरील हिंदू धर्मातील इतर पंथीय शिल्पासोबत वैष्णव प्रतिमा उत्कीर्ण केल्या आहेत.

४) तात्कालीन वैष्णव पंथातील अवतार प्रतिमा सोबतच, वैष्णव शक्ती उपासनेला महत्वाचे स्थान प्राप्त होते.

५) मंदिरावरील वैष्णव प्रतिमेस पौराणीक आधार आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार असून, यामध्ये प्रामुख्याने सर्वेक्षणात्मक व निरीक्षणात्मक संशोधन पद्धती निवडण्यात आली आहे. तसेच या संशोधनामध्ये प्राथमिक व दुय्यम संदर्भ साहित्याचा उपयोग करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा एक शिल्पशास्त्रीय अभ्यास यासाठी वरील संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

समस्या सुत्रण

इतिहासाच्या संशोधनामध्ये पौराणीक साधना सोबतच पुरातत्वीय साधने हि महत्वाची असतात. मराठवाडा परिसरात प्राचीन मंदिर वास्तू मोठ्या प्रमाणावर असून त्यावरील वैष्णव शिल्पांचे आंकन अभ्यासाच्या दृष्टीने महत्वपुर्ण आहे. तसेच हे शिल्प केवळ धार्मिक विधी, पूजा पाठ यासाठी मर्यादीत नसुन त्यातुन तत्कालीन शिल्प कलेची प्रगती झाल्याचे दिसून येते.

उपलब्ध पुरातत्व साधानावरुन वैष्णव संप्रदायाचा प्रसार-प्रचार कुठ पर्यंत झाला होता, त्याची सध्यस्थिती काय?, इतरत्र जसे सांप्रदायीक मतभेद होते, तसे ते मराठवाडयात होते का ? प्रस्तुत मतभेदावर काही उपाय शोधण्याचा प्रयत्न तात्कालीन समाजधुरीनांनी केला होता का, केला असेल तर त्याचे पुरावे मराठवाडयात कोठे कोठे पहायला मिळतात ? प्रस्तुत शिल्प निर्मीती मध्ये तात्कालीनी कारागीरांचे कौशल्य कुठपर्यंत प्रगत झाले होते त्यांच्या काही परंपरा होत्या का? शैव आणि वैष्णव प्रतीमा निर्मीतीचे प्रयोजन काय असावे ? त्या काळातील राजवटीचा प्रभाव शिल्पकलेवर होता का, असेल तर तो जाणवतो का ?

परिकल्पना

शिल्प समृध्द असलेल्या मराठवाडयामध्ये शैवा पाठोपाठ वैष्णव पंथ सुध्दा सर्वदुर पोहचलेला होता.

संशोधन साधने

प्राथमिक स्वोत

विष्णुपुराण, काश्यपशिल्पम्, रुपमंडन, बृहत्संहिता, वराहपूराण, वैष्णव उपनिषद, प्रासा- दमंडन, समरांगणसुत्रधार इत्यादी मुळ साधाणामध्ये प्रतिमा निर्माती संबंधी सखोल माहीती उपलब्ध असून त्याचा आधार प्रामुख्याने संशोधनात घेतला जाणार आहे.

व्दितीय स्वोत

मुर्तिविज्ञाण, भारताची मूर्तिकला भारतीय कला उद्‌गम व विकास, विष्णुमुर्ती नमोस्तुभ्यम् स्थानपोथ्या, मराठवाडयातील शिल्पाविष्कार, भारतीय मुर्तिशास्त्र, भारतीय संस्कृत्तीकोश, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र गॅझेटियर, जर्नल्स वार्षीके, साप्ताहीके इत्यादी मुळ शोधणाच्या आधारे निर्माण केली गेली असून त्यातून माहीती उपलब्ध होते. त्या माहीतीचा आधार हा प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

प्रत्येक्ष क्षेत्र भेट

मराठवाडयातील राष्ट्रकुट, उत्तर चालूक्य, यादव इ. कालखंडात निर्माण झालेल्या शिल्पांकीत मंदिरांना तसेच इतर शिल्पस्थळांना प्रत्येक्ष भेट देवून निरिक्षण केले जाणार आहे. या निरिक्षणाच्या आधारे व महाराष्ट्रातील इतरत्र उपलब्ध असणा-या वैष्णव शिल्पांची तौलनिक माहिती अभ्यासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

प्रकरण रुपरेषा

या प्रस्तुत शोध प्रबंधासाठी पुढिल प्रकरणात मांडणी करण्यात आली असून ती पुढिल प्रमाणे.

१) प्रस्तावना

२) मराठवाडयाची पार्श्वभूमी.

३) प्रतिमा निर्मितीची प्राचीनता.

४) वैष्णव पंथाचा आढावा.

५) मराठवाडयातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा एक शिल्पशास्त्रीय अभ्यास (इ.स.११ चे ते १४ वे शतक)

६) निष्कर्ष

प्रकरण २ रे

मराठवाडयाची पार्श्वभूमी

भौगोलिक पार्श्वभुमी

महाराष्ट्र राज्याच्या अगदी मध्यभागी येणारा प्रदेश तसेच 'मराठी' भाषा बोलणा-याची भूमी म्हणजे मराठवाडा होय हा भूभाग १५:४० ते २०:४० उतर अक्षांश ७४:४० ते ८१ : १४ पूर्व रेखांशावर वसलेले आहे. या प्रदेशाची एकूण आठ जिल्हयामध्ये विभागणी झाली असून त्याचे क्षेत्रफळ २५००० चौ. मैल असून २०११ च्या गणनेनूसार १,८७,३१,८७२ एवढी आहे. उतरेला सहयाद्रीची उपरांग, अंजींठा, वेरुळ डोंगर तसेच दख्खनच्या पठाराचा मध्य भाग, जगप्रसिध्द अर्जींठा, वेरुळ लेण्या याच भागात कोरल्या गेल्या आहेत.

मराठवाडा हा दख्खनच्या पठाराचा प्रदेश असल्याने त्यामध्ये प्रामुख्याने, 'बेसॉल्ट' आणि 'डोलोसाईट' खडकांचा भाग आहे. याचा काहि भाग 'पुलीनमयी' थराचा बनलेला आहे. या भागात उंच पठारी प्रदेश साधारणपणे समुद्र सपाटिपासुन ३०० ते ९०० मीटर उंचीवर आहे. मराठवाडयात विस्तृत डोंगररांगा पसरलेल्या आहेत. तसेच सांस्कृतीक इतिहासासाठी मोठे योगदान याच डोंगररागांनी दिले आहे. मराठवाडयातुन वाहणारी प्रमुख नदि म्हणजे 'गोदावरी' असुन तीच्या उपनदयांनी मिळूण मराठवाडयात विस्तीर्ण

नदी खोरे निर्माण झाले आहे. गोदावरीमूळे मराठवाडयाचे उत्तर भाग व दक्षिण अशा दोन भागात विभागला गेल्याचे वाटते त्याच्या उतर भागात औरंगाबाद, जालना, परभणी, उत्तर नांदेड तसेच दक्षिण भागात बीड उस्मानाबाद, लातुर दक्षिण नांदेड इत्यादीचा समावेश होतो.

गोदावरीच्या विस्तीर्ण खोऱ्यामुळे व सुपिक जमिनीचा प्रदेश असल्याने प्राचीन काळात देखील हा प्रदेश संपन्न होता. सातवाहन काळापासून मराठवाडयात भरभराट झाल्याचे दिसून येते. तसेच देशी विदेशी व्यापारी मार्ग या ठिकाणातून जात असल्याने व्यापारी प्रगती झाली होती. त्या मुळे मराठवाडा प्रदेश भौगोलीक संपन्नतेचा प्रदेश म्हणून गणला जात होता. त्याचे भौगोलीक महत्व लक्षात घेता, त्यांचा विस्ताराने अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

ऐतिहासीक पार्श्वभुमी

मराठवाडा प्रदेश हैद्राबाद संस्थानाचा निजाम शासीत प्रदेश होता. स्वातंत्र्यानंतर त्याचे भारतात विलिनीकरन झाले. पुढे भाषावार प्रांत रचणेमूळे महाराष्ट्राचा एक प्रशासकिय विभाग झाला.

मराठवाडा प्रदेशाला प्राचीन भारतीय संस्कृतीची खुप मोठी ऐतिहासिक पार्श्वभुमी प्राप्त झाली आहे. 'अश्मयुगीन' वसतीस्थाने गोदावरीच्या खोऱ्यात सापडल्याचे पुरावे आहेत. तसेच सोळा महाजन कालखंडात दोन जनपदे म्हणजे 'अश्मक' 'मुलक' याच गोदावरीच्या प्रदेशात अस्तित्वात होते. मराठवाडयाच्या इतिहासातील पहिला ज्ञात राजवंश म्हणजे 'सातवाहन' याच भागात वास्तव्यास होते. त्यानंतर सत्तेवर आलेले 'वाकाटक' यांनी या भागात आपल्या राजधाण्या वसवल्याचे पुरावे सापडतात. वाकाटकांचा राजा विध्यशक्तीच्या कार्याचे वर्णन करणारा शिलालेख / गुफालेख अजिंठा येथे आढळून आला आहे.

राष्ट्रकूटांच्या कार्यकाळात 'कंधार' 'प्रतिठानपूर' 'येलापूर' 'लत्तलुरपूर' हे राजधानीचे ठिकाणे होती. पुढील काळात सत्तेवर आलेले 'उत्तर चालूक्य' यांनी

मराठवाडयाच्या बऱ्याच प्रदेशावर प्रभुत्व होते. चालूकांच्या काळात मराठवाडयात विविध कलागुनांना आश्रय प्राप्त होवून, उत्कृष्ट मंदिरस्थापत्य व शिल्पकलेची निर्मिती झाल्याचे अनेक दर्शनी दिसून येते.

मराठवाडयात थोड्या प्रमाणात कांही राजवंशांनी सत्ता निर्माण केली होती. त्या मध्ये 'होयसळ' सोळंकी, कलचूरी इत्यादी होत्या. त्यानंतर मराठवाडयावर देवगीरीच्या यादवांची सत्ता इ.स.८५० मध्ये उदयास येवून पूढे १४ व्या शतकापर्यंत विविध क्षेत्रात विकास व संपन्नत्त प्राप्त होती.

यादव हे वैष्णव संप्रदायाचे अनुयायी असून स्वतःस कृष्ण वशातील असल्याचे मानत असत. वरिल सर्वच राजवंशांनी विविध कलागुनांना प्रोत्साहन देवून सुंदर मंदिरस्थापत्य व शिल्पकला निर्माण केली गेली असून, त्यांचे साक्ष पूरावे या प्रदेशात विखुरलेली व कांही चांगल्या स्थितीत आजही पहावयास मिळतात.

प्रकरण ३ रे

प्रतिमा निर्मितीची प्राचीनता

सिंधु संस्कृती मधील उत्खननातून प्राप्त झालेल्या मातृदेवता शिवदेवता, पशुपती लिंग, प्रतिमा तसेच हडप्पा येथे प्राप्त पुरुषाची प्रतिमा मोठ्या प्रमाणात सापडल्या आहेत. ऋग्वेदामध्ये व्दिशीर्ष शिवाचा उल्लेख आलेला आहे. वृषभ, घोडा आणि इतर प्राणी प्रतिमा आढळून आल्या आहेत. यावरुन प्रतिमा निर्मितीची प्राचीनता सिंधू संस्कृती पासून सूरु झाली असावी. मानव हा सुरुवातीपासूनच निसर्ग शक्तींना देव मानत असत. पशु, पक्षी, दगड, वृक्ष, डोंगर यांची देवाच्या स्वरुपांत पूजा करत असे वैदिक संस्कृत्ती मध्ये 'अग्नी' ,'इंद्र', 'सविता', 'मित्र', 'वरुण', विष्णू, 'रुद्र' ईत्यादी प्रतीमांचा उल्लेख सापडतो या वरुनच वैदिक संस्कृती- मध्ये देखिल प्रतिमा निर्माण झाल्याचे निदर्शनात येते. महाभारत, रामायण, भगवद्गीता, पुराणे यामध्ये प्रतिमा निर्मितीचे उल्लेख प्राप्त होतात. अग्निपूराण मत्स्यपुराण, विष्णूधर्मोत्तरपूराण यात मूर्तिनिर्मीतीचे उल्लेख मिळतात. पुढील काळात मौर्य कालखंडामध्ये बौध्द, जैन धर्म उदयास येवून हिंदू

धर्मातील यज्ञयागाची परंपरा व महत्व कमी झाले, तसेच शिव, विष्णू, कुबेर, गणेशलक्ष्मी इत्यादींची प्रतिमाव्दारे पूजन व उपासना पध्दती हिंदू धर्मात सूरु झाली. सम्राट अशोकाच्या काळात देवदेवतांची संख्या वाढून आठ-दहा हात असणाऱ्या प्रतिमा उत्कीर्ण केल्याचे पूरावे सापडतात.

शुंग काळामध्ये मुर्तीकलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे लक्षात येते. या काळात प्रतिमा स्पष्ट व सुरेखपणे निर्माण झाल्याचे दिसून येते. सहयाद्रीच्या डोंगरामध्ये अनेक सुंदर गुंफा निर्माण होऊन सुंदर शिल्पांकीत प्रतिमा कोरल्या आहेत. शुंग कालिन प्रतिमा दोन प्रकारात आढळून येतात. त्या मध्ये पहिला मौर्य शुंगकालीन व दूसरी भारहूत येथील मुर्तिकला हि पूर्णपणे शुंगकालीन कलेचे वैशिष्ट्ये आहे. 'भारहुत' येथील शिल्पाचे वर्णन जनरल 'कॅींगहॅमेन' केलेले आहे. इ.स. पहिल्या व दूस-या शतकामध्ये कुषानकालीन प्रतिमा उत्तर भारतात सापडतात. कुषाणांची मुर्तिकला देशी-विदेशी स्वरुपात होती. त्यानंतर मथुरा शैलीचा उगम व विकास झाला असून हि संपूर्ण भारतीय शैली आहे. मथुरा शैलीतील अनेक प्रतिमा सापडतात. गुप्तकाळामध्ये दगड, धातू, मातीपासून मुर्तिची निर्मिती झाल्याचे दिसून येते. या प्रकारच्या प्रतिमा मथुरा, पाटलीपुत्र सारनाथ येथे प्राप्त होतात. देवगडच्या मंदिरावरील 'शेषशायी' विष्णु, 'गजेंद्रमोक्ष', विष्णू 'नर-नारायण' या सारखी शिल्प गुप्तकालीन उत्कृष्ट उदाहरण आहे या वरुन असे लक्षात येते कि, गुप्त काळात 'प्रतिमा' निर्मीती मोठ्या प्रमाणात झाली होती.

प्राचीन काळात बांधीव शिल्पांकीत मंदिर निर्मीती समांतर सुरु होवून पुढिल काळात मंदिर शैली दख्खनमधील मराठवाडयामध्ये प्रचलित झाली असावी. मराठवाडयामध्ये मंदिरस्थापत्या सोबतच प्रतिमा निर्मितीस सुरुवात झाली. उत्तर चालूक्यांच्या काळातील शिल्प कलाविष्काराचे उत्कृष्ट उदाहरण मराठवाडयात पहावयास मिळते. चालूक्य शैलीतील प्रतिमा शिल्प हे शास्त्रीय पध्दतीने निर्माण केल्याचे दिसुन येते. त्यानंतर यादव शैलीचा प्रभाव शिल्प निर्मितीवर झाल्याचे दिसून येते.

यादवांची सत्ता इ.स.८५० मध्ये मराठवाडयावर उदयास आली. यादवांच्या काळात मंदिर निर्मिती व शिल्पकला प्रगती पथावर होती. अनेक वैष्णव प्रतीमांची

निर्मिती झाल्याचे दिसून येते. परंतू उत्तर यादव काळात मात्र प्रतिमा निर्मिती थंडावल्याचे पुरावे सापडतात. उत्तर यादवांच्या काळात मुस्लीम आक्रमनामूळे प्रतिमा निर्मिती कला नष्ट होण्यास प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

प्रकरण ४ थे

वैष्णव पंथाचा आढावा

भारतात आर्यांच्या आगमनापूर्वी असलेला लौकीक धर्म आणि आर्यांचा वैदिक धर्म यांच्या समिश्रणातून हिंदू धर्माचा उदय झाला. सिंधू संस्कृत्तीपासून मातृदेवता पशुपती, पुजा प्रचलित होती. पुढे वैदिक धर्मातील इंद्र, वरुण, अग्नि, रुद्र यासारख्या देवतांची जागा पुराण काळात 'शिव' 'विष्णू' या देवतांनी घेतली. वैदिक विष्णू हा सुर्याचे अनेक गुणविशेष घेवून सर्व श्रेष्ठ बनला. ऋग्वेदातील, अदित्य संघातील आणि सौरसंघातील देवता एकमेकांच्या संघात विलिन होवून अदितीने पूढे तपश्चर्या केली असता तिला 'विष्णू' पुत्र झाला. विष्णूच्या मते सृष्टीच्या आरंभी भगवान विष्णू आणि त्याचा 'काल' सराक रुपाने साधले गेलेले 'प्रधान' आणि 'पुरुष' असे तिघेच अस्तित्वात होते. सृष्टीच्या तिन अवस्था आहेत 'उत्पत्ती' 'स्थिती' आणि 'लय' या अवस्थांना कारणीभूत ठरणा-या देवता म्हणजे 'ब्रम्हा', 'विष्णू' शिव आहेत.

ऋग्वेदामध्ये वैष्णव संप्रदायातील विष्णू देवतेचा सर्वप्रथम उल्लेख येतो. विष्णू तिन पावले टाकत 'पृथ्वी,' 'अंतरिक्ष' सर्व लोक व्यापतो असे म्हटले आहे. महाभारतामध्ये 'त्रिसुपर्ण' असा 'विष्णूचा 'उल्लेख आढळतो. रामायन महाभारत या आदि ग्रंथात वैष्णव धर्माच्या प्राचीनतेचा संदर्भ सापडतो. यावरुन वैष्णव संप्रदायाची प्राचीनता लक्षात येते. पूढिल काळात वैदिक यज्ञयागाची परंपरा बरीच कमी होवून भक्तीवर आधारित मुर्तिपूजा प्रचलित झाली असावी असे दिसून येते. पुढे वैष्णव पंथाची मंदिर निर्मिती होवून वैष्णव पंथाचा प्रसार व प्रचार संपूर्ण भारतभर झाला असावा. मौर्य काळामध्ये हिंदु धर्मातील वैष्णव प्रतिमा निर्माण केल्या गेल्या असून त्यामध्ये 'वैष्णवी' 'अश्विनी' 'लक्ष्मी' इ. मंदिराचा उल्लेख मिळतो त्याचप्रमाणे 'देवगृह' 'देवप्रतिमा'

उपास्यदेवता इत्यादी देवतांचा स्पष्ट उल्लेख येतो. अपराजित (दूर्गा) 'अप्रतिहत', विष्णू, जय्यंत (सुब्रम्हण्य) 'वैजनत्न' (इंद्र) यांचा उल्लेख मिळतो. यावरुण मौर्य काळात देखिल वैष्णव पंथाचा प्रसार झाला होता.

शुंगकाळात 'वैष्णव' पंथाचा 'मुर्तीकलांच्या' माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रसार व प्रचार झाल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रामध्ये शुंगानी 'भाजे' 'कार्ले' 'बेडसा' 'पितळखोरा गुफा' निर्माण करुण शिल्पकलेचे उत्तम उदाहरण ठरते. शुंगकाळात उत्तर भारतात वासूदेवाचे चतुशाल मंदिर, तोरण, वेदिका हे शुंगकालिन वैष्णव पंथाच्या प्राचीनतेचे उत्तम उदाहरण ठरते. तसेच शेष संकर्षणाची एक दगडी प्रतिमा मथुरा येथे सापडते. शुंगाच्या कांहि नाण्यावर 'विष्णूमित्र' 'सप्तमी' व 'शेषदत्त' इ. वैष्णव पंथाशी संबंधीत नांवे येतात. एकंदरीतच शुंग हे वैष्णव संप्रदायाचे उपासक असून शुंगकालखंडामध्ये वैष्णव संप्रदायाचा विकास झाल्याचे दिसून येते.

एकंदरीत शुंगकालीन नाणी-मुर्ती यावरुण 'वैष्णव पंथाची' प्राचीनता लक्षात येते. इ.स. पहिल्या, दुस-या शतकात कुषाणकाळात वैष्णव प्रतिमा उत्कीण झाल्याचे पुरावे सापडतात, 'वासूदेव', 'बालकृष्ण', प्रतिमा तसेच 'गोवर्धण' विष्णु इ.चा समावेश कुषान कालिन वैष्णव प्रतिमेमध्ये होतो. सुर्याची प्रथम मुर्ती कुषानांनी तयार केल्याचे मथुरेमध्ये आढळून येते. 'विष्णू चे अवतार', लक्ष्मी शिल्पातून वैष्णव संप्रदाय कुषान कालखंडामध्ये प्रचलित होता.

इ.स.चौथ्या शतकात गुप्त सत्ता भारतात होती. गुप्त सम्राट स्वतःला परमभागयत म्हणून घेत असत ते 'भागवत' धर्माचे अनुयायी असल्याने वैष्णव संप्रदायास राजाश्रय प्राप्त झाला होता. गुप्तकाळात वैष्णव संप्रदायातील विष्णू अवतार पूजा लोकप्रीय असावी याचे पूरावे म्हणजे राम, वराह या गुप्तकालीन शिल्प निर्मितीवरुन लक्षात येते.

वैष्णव संप्रदाय जसा उत्तर भारतात लोकप्रिय झाला तसा तो मुर्तिशिल्पाचा माध्यमातून महाराष्ट्रामध्ये देखिल लोकप्रिय झाल्याचे दिसून येते. उत्तर चालूक्य सत्ता महाराष्ट्रात स्थिरावल्यानंतर 'वैष्णव' शिल्पांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली, चालूक्य

राजवंश हे 'वैष्णव' पंथाचे उपासक होते. त्यांनी गुप्त वंशा प्रमाणे मराठवाडयामध्ये वैष्णव संप्रदायातील प्रतिमा व मंदिर बांधून त्याचा प्रसार व प्रचार केला असावा. त्या नंतर यादव काळ वैष्णव संप्रदायाच्या प्रचारासाठी महत्वाचा ठरला होता, यादव स्वतः 'यदू' वंशीय मानत होते. यादवांनी वैष्णव संप्रदायाची अनेक देवालये व शिल्पनिर्माण केल्याचे पुरावे मराठवाडयात अनेक ठिकाणी सापडतात. यादव मंदिर शैलीस 'हेमांडपंती' म्हणून सर्वज्ञात आहे.

एकंदरितच मराठवाडया मध्ये वैष्णव पंथाची प्राचीनता लक्षात येते. या प्रकरणात मराठवाडयातील वैष्णव संप्रदायाची प्राचीनतेचा सखोल अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण ५ वे - मराठवाडयातील मंदिरावरील वैष्णव प्रतिमा एक शिल्पशास्त्रीय अभ्यास (११ वे ते १४ वे शतक)

मराठवाडयातील अनेक प्राचीन मंदिराचा वारसा लाभलेला असुन शिल्पशास्त्र कला विकासाचे एक उत्तम उदाहरण आहे. या मंदिरावर हिंदू धर्मातील शैव, वैष्णव, शाक्त, गाणपात्य या संप्रदायाच्या शिल्पांचे आंकन केलेले दिसुन येते. तथापी प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडयातील इ.स. ११ वे ते १४ व्या शतकातील बांधलेल्या कांही मंदिरावरील वैष्णव शिल्पांचा अभ्यास करण्यात येणार असून यामध्ये खालील मंदीर आणि शिल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

धर्मापूरीचे केदारेश्वर मंदिर शिल्पशास्त्राच्या दृष्टीने महत्वपूर्ण असून या मंदिराच्या बाहयांगावर वैष्णव संप्रदायातील विष्णु, वामन, अवतार प्रतिमा, वराह, केशव, नरसिंह, विष्णू-लक्ष्मी, मुरारी कृष्ण यांचे आंकन केलेले आहे. हा चालूक्य कलेचा उत्कृष्ट कलाविष्कार या मंदिरावर झाल्याचे निदर्शनात आले आहे.

तसेच निलंगामध्ये निळकंठेश्वराचे मंदिर आहे. हे चालूक्य कालीन कलास्थापत्याचे उत्तम उदाहरण असून या मंदिराच्या बाहयांगावर 'वैष्णव' परिवारातील 'विष्णू,' 'वराह' नरसिंह यांचे सुंदर शिल्पांकन केले आहे.

अन्या मंदिराच्या बाहयभागावर 'गजलक्ष्मी' 'नरसिंह' विष्णू शक्ती शिल्प यांचे आंकन केलेले आहे. या ठिकाणी 'त्रिभंगावस्थेत' विष्णू प्रतिमा कोरलेली असून शिल्पकलेचे अप्रतीम उदाहरण आहे. तसेच 'आलिढासन' आवस्थेतील विष्णू शिल्प दिसून येते.

बीड मध्ये देखील कंकालेश्वर मंदिरा शिल्पाचा संदर्भात अप्रतिम आहे. मंदिराच्या बाहयभागवार विविध देवतांचे शिल्पांकन केले गेले असून, त्यात 'राम' आणि 'परशूराम तसेच मत्स्य कुर्म प्राणीरुपात दिसून येतात. यासोबतचे 'कल्की' अवताराचे शिल्प देखिल आढळते. खडकेश्वर मंदिराच्या एका शिल्पपटावर 'वेणू वाजवणारा 'श्रीकृष्ण' आणि 'फेर' धरुण नाचणाऱ्या गोपी असे सुंदर शिल्पांकन आहे.

अशाच प्रकारचे मंदिर परभणी जिल्हयातील जांब या गावात आढळुन आले. मंदिराच्या बाहयभागावर वैष्णव संप्रदायातील विष्णुच्या बारा विभवांची रचणा केलेली दिसून येते. या मध्ये 'संकर्षन', 'वासुदेव', 'प्रदुम्न', 'अनिरुध्द', 'पुरुषोत्तम' या चोवीस मुर्ती व त्यांच्या हातातील आयुधाक्रम दक्षिणाथः क्रमाने तसेच यावरण 'विष्णू' केशवाच्या रुपात कि 'नारायणच्या' कि 'माधवाच्या' या सारखी प्रश्नांच्या स्वरुपात हे एक शिल्पशास्त्राचे उदाहरण आहे.

गंगाखेड तालुक्यातील 'गुप्तेश्वर' मंदिर हे एक शिल्प शास्त्राच्या दृष्टीने संपन्न असुन त्यावर 'विष्णूच्या' 'पंचब्रम्ह' रुपातील 'दामोधर' 'ऋषिकेश' 'पद्मनाभ' 'वामन', 'श्रीधर' या प्रतिमांचे आंकन केलेले आहे.

हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ मंदिर तर शिल्पकलेच्या उत्कृष्ट कलाविष्कार झाल्याचे दिसून येते. मराठवाडयातील इतर मंदिराच्या तुलनेत या ठिकाणी शिल्पांची संख्या सर्वात जास्त आहे. यात 'वैष्णव' संप्रदायातील 'माधव' 'अनिरुध्द' 'हायग्रीव' 'त्रिविक्रम' 'विष्णू लक्ष्मी' 'लक्ष्मी नारायण' यासारख्या शिल्पांचे आंकन केलेले आहे. उमरग्याचे शिवमंदिर हे त्रिदलिय पध्दतीचे असून 'वैष्णव' संप्रदायाची शिल्प प्रमाण जास्त आहे. यावरुन हे मंदिर हे वैष्णव संप्रदायाचे असावे. यावर 'नरसिंह' 'समुद्रमंथन'

'विष्णूचे दशावतार' या शिल्पाचे आंकन आहे. तसेच द्वारशाखेवर वैष्णव परिवार देवता आहेत मग हे मंदिर 'वैष्णवाचे' असावे का हा प्रश्न पडतो. अंभई वाडेश्वर हे मंदिर 'त्रिदलिय' असून याचे दक्षिण गर्भगृह 'विष्णूला' समर्पित आहे. मंदिराच्या बाहयांगावर 'विष्णू', 'नरसिंह', 'नर-नारायण', 'तर-वराह' तसेच 'सप्तमातृकापैकी' 'वैष्णवी' मातृकेची शिल्प आहे. अंबेजोगाई येथे आमलेश्वर मंदिरावर 'वामन' अवताराचे शिल्पांकन आढळून येते.

निलंगामधील निळकंठेश्वर मंदिर चालूक्यकालीन स्थापत्याचे उत्तम उदाहरण आहे. पानगावच्या विठ्ठल मंदिरावर देखिल 'वैष्णव' संप्रदायातील शिल्पश्रंखला पहावयास मिळते. वरिल सर्वच मंदिरावरील शिल्प अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असून या शिल्पांचा सखोल व शास्त्रीय पध्दतीने अभ्यास होणे आवश्यक ठरते.

प्रस्तूत प्रकरणात मराठवाडयातील मंदिरावरील 'वैष्णव' संप्रदायातील शिल्पांचा अभ्यास केला जाणार आहे.

निष्कर्ष

या प्रकरणात संशोधन आणि अभ्यासातून प्राप्त होणा-या निष्कर्ष दिले जाणार असून प्रस्तूत संशोधन आराखडा स्थूल स्वरुपाचा असून संशोधनादरम्यान त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

संदर्भ ग्रंथ

१) खरे ग.ह. मुर्तिविज्ञाण, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३९.

२) कुलकर्णी र.पु. काश्यशिल्प, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९८७.

३) गद्रे प्रभाकर, मंदिरस्थापत्याचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१०.

४) जोशी नी.पु. भारतीय मुर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ मंडळ, नागपूर, १९७९.

५) जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तीकला, अनमोल प्रकाशन, पुणे, १९८०.

६) देगलूरकर गो. ब. विष्णुमूर्ते नमोस्तुभ्यम, श्री व्दारिकाधिश चॅरिटिज, कर्नाळा.

७) देव प्रभाकर महाराष्ट्राचे प्राचीन कला वैभव, संपा काळे भगवान, १९८८.

८) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) वैदिक संस्कृतीचा इतिहास.

९) कुलकर्णी वि.य., भारतीय कला उद्गम अणि विकास पूर्वोक्त.

१०) श्रीकृष्ण जुगनू, भंवर शर्मा, अपराजितपृच्छा परिमल प्रकाशन, दिल्ली.

११) अग्निपूराण, गीताप्रेस गोरखपूर.

१२) काटे पी.व्ही. मराठवाडयाचा इतिहास, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, १९९९

१३) देशपांडे ब्रम्हानंद, देवगिरिचे यादव, अपरांतु प्रकाशन पुणे, २०१३.

१४) काणे पांडूरंग वामन धर्मशास्त्राचा इतिहास साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, १९६७.

१५) देव प्रभाकर मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे.

इंग्रजी संदर्भ

1) Deshmukh B.S., Icnography of Hindu Temples. in Marathwoda, Jaipur Publication, Scehme. 1987.

2) Gopinathrao T.A., Elements of Hindu Icnography Vol 2, Part 2, Second Edition, Motital Barasidas Indologicle Publication, Delhi, 1968.

गॅझीटियर

परभणी, औरंगाबाद, जालणा, बीड, उस्मानाबाद, लातूर,

हिंगोली, जिल्हा गॅझीटीयर, महाराष्ट्र शासन, मुंबई.

संशोधक

गाडगे विश्वमित्र बाबाराव
एम.ए.बि.एड, स्टडी ऑफ म्युझियम, डि. योगा

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ.बावळे एन.पी.
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
प्रमुख, शारदा महाविद्यालयकला व विज्ञाण परभणी.
इतिहास अभ्यासमंडळ सदस्य स्वा.रा.ती.म.वि.नांदेड